**बातमी क्र.१**

जळगाव दि.११ ( ) आजुबाजूच्या सामाजिक प्रश्नाकडे तरुणांनी डोळसपणे पाहायला हवे त्यातूनच त्यांना प्रश्न पडून या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचे मार्ग देखील सापडतील असे प्रतिपादन लेखक व मुक्त पत्रकार नरेंद्र लांजेवार यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या वतीने कर्मवीर व्यंकटराव रणधीर व्याख्यानमालेतंर्गत मंगळवार, दि.११ सप्टेंबर रोजी श्री.नरेंद्र लांजेवार (बुलडाणा) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव भ.भा.पाटील होते. यावेळी मंचावर कर्मवीर व्यंकटराव रणधीर प्रतिष्ठानचे विश्वस्त रोहित रंधे, प्राचार्य एस.एन.पटेल, सामाजिकशास्त्रे प्रशाळेच्या संचालक प्रा.अर्चना देगावकर उपस्थित होते.कर्मवीर व्यंकटराव रणधीर प्रतिष्ठान, शिरपूर यांनी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते.

श्री.लांजेवार यांनी `या प्रश्नांचे करायचे काय ` या विषयावर मांडणी केली. ते म्हणाले की, आपल्या भोवती असंख्य प्रश्न आहेत, मात्र त्याची उत्तरे माहीत नाही. प्रश्न सुटू नयेत अशी व्यवस्था निर्माण करण्याचे षडयंत्र रचले जात आहे. कारण प्रश्न सुटले तर विचारणार कोण असा विचार करणारा वर्ग निर्माण झाला आहे. शिक्षणात नवी चातुर्वण व्यवस्था निर्माण झाली असून सुदाम आणि कृष्ण यांची ताटातूट होऊन सुदाम जिल्हा परिषद किंवा मनपाच्या शाळेत शिकू लागला आहे. तर कृष्ण हा आंतरराष्ट्रीय शाळेत शिकतो आहे. पैसे देवून शिक्षण घेता येते ही मानसिकता वाढीला लागत असल्यामुळे सामाजिक संवेदना लोप पावत चालली आहे. जागतिकीकरणामुळे तरुणाई स्वमग्न झाली असून जिज्ञासा मारण्याचे काम तंत्रज्ञानाने केली आहे, अशी खंत श्री.लांजेवार यांनी व्यक्त केली.

अध्यक्षीय भाषणात कुलसचिव श्री.पाटील यांनी देशात बुध्दीमान तरुणांची कमतरता नसल्यामुळे हा देश पुन्हा गुलामगिरीत जाणे शक्य नाही असे मत व्यक्त करुन विद्यार्थ्यांनी न्यूनगंडाची भावना दूर करावी आणि देशाच्या विकासात योगदान द्यावे अशी अपेक्षा बोलून दाखविली. प्रारंभी जनसंपर्क अधिकारी डॉ.सुनील पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा.फुला बागुल यांनी कर्मवीर व्यंकटराव रणधीर यांच्या विषयी माहिती दिली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा.दीपक सोनवणे यांनी केले.

-----

**बातमी क्र.२**

जळगाव दि.11 ( ) पाकिस्तानची ढासळत चाललेली अर्थव्यवस्था, दारिद्रय आणि बेरोजगारी लपविण्यासाठी जम्मू कश्मिरच्या निमित्ताने पाकिस्तानकडून धर्माचे राजकारण जिवंत ठेवले जात आहे. अशा वेळी भारतीयांनी एकसंघ होवून राष्ट्रवादाची भावना वाढीला लावावी असे मत सेवानिवृत्त मेजर जनरल डॉ.जी.डी. बक्षी यांनी व्यक्त केले.

..2..

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील विचारधारा प्रशाळेतंर्गत असलेल्या स्वामी विवेकानंद अभ्यास व संशोधन केंद्राच्या वतीने आज दि. 11 सप्टेंबर रोजी निवृत्त मे.जनरल डॉ.जी.डी.बक्षी यांचे `भारताच्या राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हाने, विशेष संदर्भ सीमेपलिकडील दहशतवाद` या विषयावर व्याख्यान झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलसचिव भ.भा. पाटील होते. डॉ.बक्षी म्हणाले की, स्वातंत्र्य प्राप्ती नंतर कश्मिर देखील भारतात विलीन झाला होता मात्र कश्मिरला विशेष दर्जा दिला गेला. त्यामुळे कश्मिर समस्या अधिक बिकट होत गेली. भारतीय सैन्याने हा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला मात्र रणांगणात जिंकूनही राजकीय तहात मात्र आपण पराभूत झालो. या प्रश्नावर सार्वमत घ्यायला भारताची तयारी आहे परंतू पाकिस्तानची तयारी नाही. अलिकडच्या काळात सैन्यावर दगडांचा मारा करण्याचे प्रकार वाढीला लागले आहेत. कारण पाकिस्तान रणांगणातील युध्द लढू शकत नाही. अशा वेळी कश्मिर मधील मानवी हक्कांवर गदा येत असल्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवर चित्र निर्माण केले जात आहे. हा प्रश्न सुटू शकत नाही याची पाकिस्तानला देखील कल्पना आहे. मात्र तो सुटू नये हीच त्या देशाची इच्छा आहे. कारण त्यातून निधी उभा राहतो आणि शस्त्र घेता येतात. जम्मू-कश्मिर मधील कुणालाही स्वतंत्र राष्ट्राची निर्मिती नको आहे. केवळ कश्मिरमधील सहा जिल्हयांमध्ये तुरळक ठिकाणी स्वतंत्रतेची मागणी केली जात आहे. पण ते शक्य नाही असे सांगून डॉ.बक्षी यांनी भारतात अस्थिरता निर्माण करण्याचे पाकिस्तानचे प्रयत्न उधळून लावण्याचे आवाहन करताना जातीयवाद आणि प्रादेशिकवाद याच्या आहारी न जाता राष्ट्रवादाची भावना वाढवा असे तरुणांना आवाहन केले. केंद्राचे विभागप्रमुख प्रा.आर.बी.गोरे यांनी प्रास्ताविक केले. विचारधारा प्रशाळेचे संचालक प्रा.अनिल डोंगरे यांनी आभार मानले.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक :11 सप्टेंबर, 2018

प्रति,
**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी